<u>**माहे ऑगस्ट २०२२ महाचा मासिक अहवाल :-**</u>

<u>**मासिक अहवालामध्ये खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.**</u>

| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १ | कोल्हापुर | स्टेला जर्मन शेफर्ड | १) पोहवा/१२५८ पी.एस. निंबाळकर<br>२) पोना/७१२ पी.एन.सुर्वे | जुना राजवाडा पो.स्टे. गु.र.नं. ३६०/२०२२ भा.द.वि. कलम ३०२, ३४ प्रमाणे हा गुन्हा दि.२६/६/२०२२ रोजी १५:३७ वाजता दाखल असून सदर गुन्हयातील घटनास्थळावर मयताचे शेजारी पडलेल्या संशयीत चप्पलचा वास गुन्हेशोधक श्वान स्टेला हिस देवुन सोडले असता ती मयताचे आजुबाजूस फिरून घटनास्थळापासून छत्रपती राजे संभाजी शाळेचे लगत असले रोडवर येवुन आजुबाजूस फिरून थांबली. सदर मार्गदर्शनाचे अनुशंगाने रोडवरील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता संशयीत दोन इसमांचा वावर दिसुन आला त्या अनुशंगाने सदर इसमांना ताब्यात घेतले असता त्यांनी गुन्हयाची कबुली दिली आहे. |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | सिंधुदूर्ग | ब्राव्हो<br>लॅब्राडोर | १) पोहवा/९०६<br>आर.आर.परब<br>२) पोना/११४<br>एस.एस.कांदळगावकर | देवगड पो.स्टे. गु.र.नं. ६३/२०२२ एनडीपीएस ॲक्ट १९८५ चे कलम २० (b) (ii) (b) ८ (c) हा गुन्हा दि.१०/८/२०२२ रोजी १९:२१ वाजता दाखल असून श्री.संदीप भोसले, पोलीस निरीक्षक, स्थागुशा सिंधुदूर्ग यांचे आदेशान्वये देवगड पो.स्टे. हद्दीतील टेंबवली कालवीवाडी ता.देवगड येथील इसम नामे संतोष भास्कर पारकर, वय ५६ यांचे घराची तपासणी श्वान ब्राव्हो या चे मदतीने केली असता श्वान वास घेत घेत घरातील पहील्या खोलीमध्ये असलेल्या टिपॉईवरील टिव्हीच्या पाठीमागे श्वान ब्राव्हो हा जोरजोरात भुंकला व तेथे ठेवलेल्या दोन प्लॅस्टीक पिशव्यांचा चावा घेवुन इशारा दिला. सदर पिशव्यांमध्ये गांजा असल्याचे संतोष भास्कर पारकर यांनी सांगीतले. सदर प्लॅस्टीक पिशव्यांमध्ये एकुण २ किलो १५८ ग्रॅम गांजा मिळुन आला. |




**अशा प्रकारे माहे ऑगस्ट २०२२ मध्ये श्वान पथकामार्फत खून - १, एनडीपीएस ॲक्ट - १ असे एकुण - २ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.**